VOL- IX ISSUE- V MAY 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# कुटूंब, विवाह व आप्तसंबंधावर सामाजिक माध्यमांचा परिणाम

**प्रा. डॉ. अप्पाराव चंद्रराव गायकवाड**
आदर्श महाविध्यालय, उमरगा
ता. उमरगा जि. उस्मानाबाद
पिन कोड, नं. ४१३६०६

**१. प्रस्ताविक : -**

भारतीय समाजामध्ये कुटूंब, विवाह, आप्त, धर्म, जात, शिक्षण, अर्थ, राज्य इत्यादी प्रमुख सामाजिक संस्था आहेत. त्यापैकी कुटूंब आणि विवाह या दोन प्रमुख सामाजिक संस्था संपूर्ण भारतीय समाजाचा आधार आहेत. म्हणूनच समाजात व्यक्तीनंतर कुटूंब या घटकाला प्रथम प्राधान्य देण्यात येते. कुटूंब संस्था ही अनेक व्यक्तींचे मग ते रक्ताचे. विवाहाचे मानलेल्या नात्यांच्या व्यक्तीचे एकत्रीकरण किंवा समुह आहे. यामध्ये आप्त संस्था किंवा नातेदारी व्यवस्था अतिशय महत्वाची आहे. संपूर्ण कुटूंब संस्था ही प्रामुख्याने त्यातील नातेसंबंधावर आधारलेली संस्था आहे, म्हणूनच कुटूंब आणि आप्त संस्था यांचा निकटचा संबंध आहे. या अर्थाने कुटूंब, विवाह या नंतर तिसरी महत्वाची सामाजिक संस्था म्हणजे आप्त संस्था होय संपूर्ण भारतीय समाज व्यवस्थेवर या तीन सामाजिक संस्थाचा वेगवेगळया पातळीवरती प्रभाव जाणवतो, व्यक्तींच्या प्रमुख गरजा अन्न्, वस्त्र, निवारा या शिवाय लैंगिकता प्रामुख्याने कुटूंब आणि विवाह या सामाजिक संस्थांच्या माध्यमातून पूर्ण केल्या जातात. त्यापैकी अन्नाची गरज कुटूंबाच्या तर लैंगिक गरज समाजमान्य मार्गाने विवाहाच्या माध्यमातून एकत्र आलेल्या जोडीदाराच्या माध्यमातून पूर्ण कली जाते ज्यामध्ये आप्तसंस्था ही महत्वाची भूमिका बजावते. पूर्वीच्या काळात प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत कुटूंब , विवाह आणि आप्त या तिन्हीही सामाजिक संस्था अतिशय महत्व पूर्ण होत्या. प्रत्येक व्यक्तीची ओळख ही त्यांच्या कुटूंबावरून, त्यांच्या नातेवाईकावरून होत असते. व्यक्तीचा दर्जा त्याच्या कुटूंबाच्या आणि नातेवाईकाच्या प्रतिष्ठेवरून ठरविला जात असे व त्याच्याशी कशा प्रकारचे वर्तन व्यवहार करावयाचे हे निश्चित केले जाते असे. कुटूंबातील संस्था व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासातील महत्वाचे घटक मानले जात अस. व्यकती चांगला किंवा वाईट हे त्याच्या कुटूंब व आप्तस्वकियांवरून ठरवले जात असे. धार्मिक विधी व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळी कुटूंब सदस्यांची व आप्तीस्वकियांची महत्वाची भूमिका होती. कमी अधीक फरकाने आजही आहेच, परंतु त्यामध्ये काही बदल झालेले दिसतात. उदा. पूर्वीच्या काळात बहुतेक महत्वाच्या कार्यक्रमात कुटूंबातील सर्व सदस्यांची व जवळच्या प्रमुख नातेवाईकांची उपस्थिती होती परंतु आज सामाजिक माध्यमांची उपलब्धता म्हणून व्हॉटसअॅप, टिव्टर, बॉल्गज, फेसबुक इत्यादी माध्यमातून शेभच्छा देवून प्रत्यक्ष उपस्थिती टाळली जात आहे. व्हिडीओ कॉलिंग, कॉन्फरन्स सारख्या इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अप्रत्यक्षपणे संवाद साधला जात आहे. जागतिकरण, विविध प्रसार माध्यमे आणि सामाजिक माध्यमामुळे आज कुटूंबसंस्था, विवाहसंस्था, आप्तसंस्था या मुलभूत सामाजिक संस्थांच्या स्वरुपावर परिणाम होताना स्पष्टपणे दिसून येत आहे.

प्रस्तुत शोध निबंधतात यावर चर्चा करण्यात आली आहे. प्रस्तुत शोधनिबंध एकूण ६ भागामध्ये विभाजीत करण्यात आला आहे. ज्यामध्ये सुरूवातीला शोधनिवबंधाची थोडक्यात प्रस्तावना करण्यात आली आहे. दुसऱ्या भागात शोधनिबंधासाठीची संशोधन पध्दती स्पष्ट केली आहे. तिसऱ्या भागात शोधनिबंधाच्या मथळयावरून येणाऱ्या विविध संबंध संकल्पना ज्यामध्ये विवाह, कुटूंब, आप्त, जागतिकरण, सामाजिक माध्यमे इत्यादी थोडक्यात स्पष्ट करण्यात आल्या आहेत. त्यानंतर शोधनिबंधाच्या चौथ्या भागात जागतिकरणाचा कुटूंब, विवाह यावर झालेला परिणाम विश्लेपीत करून या शोधनिबंधाचा कुटूंब, विवाह व आप्त संबंधावर सामाजिक माध्यमांचा परिणाम पाचव्या भागात सविस्तरपणे विशेद केला आहे. तर शेवटच्या भागात

एकंदरीत अभ्यासाअंती प्राप्त झालेल्या निष्कर्षाचे व त्या अनुषंगाने काही शिफारशींची मांडणी केली आहे.

**२. संशोधन पध्दती :-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. समस्या का निर्माण झाली व त्यावरील निराकरण हे या पध्दतीचे महत्वांचे वैशिष्टये असते त्यानुसार प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कुटूंब, विवाह व आप्त संस्था या सामाजिक संस्थांवर सामाजिक माध्यमाचे कोणते दुष्परिणाम झाले आहे व त्यातून कोणत्या समस्या निर्माण होत आहेत व या संस्थांमध्ये सामाजिक माध्यमामूळे कोणते बदल झालेले आहे हे विश्लेषीत करण्यात आले आहे. त्यासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा उपयोग करणया आला आहे.

**२.१ उद्दिष्टये :**

१. सामाजिक माध्यमांचा कुटूंब, विवाह व आप्त संबंधावरील परिणाम अभ्यासणे.
२. कुटूंब, विवाह व आप्त संस्था यामधील परिवर्तनात सामाजिक माध्यमांची भूमिका तपासणे.
३. जागतिकीकरण प्रक्रियेचा कुटूंब संस्थेवरील परिणाम अभ्यासणे.

**२.२ शोध निबंधाची गृहित कृत्ये :**

१. विविध सामाजिक माध्यमांचा कुटूंब, विवाह व आप्त संस्थावर वाईट परिणाम होत आहे.
२. सामाजिक माध्यमामुळे कुटूंब, विवाह, आप्तसंस्था यामध्ये परिवर्तन होत आहे.
३. सामाजिक माध्यमामुळे कुटूंब, विवाह व आप्त संस्थांच्या कार्यात बदल होत आहे.
४.जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा कुटूंब संस्थेवर मुलगामी परिणाम होत आहे.

**२.३ तथ्य संकलन :**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी पूर्णत: दुय्यम स्त्रोताचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, दैनिकामधील प्रासंगीक लेख व बातम्या, विविध संकेतस्थळे यांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विविध संबंध संकल्पना :**

३.१ कुटूंब : समाजातील प्रत्येक व्यकतीचा संबंध कुटूंबाशी असतो. व्यक्ती कुटूंबात जन्माला येतो, कुटूंबात लहानाचा मोठा होतो व कुटूंबातच त्याचा अंतही होतो म्हणजेच काही अपवाद वगळता बहुतेक व्यकतीचा कुटूंबात अधिक काळ व्यतित होतो. कुटूंब हा एक प्राथमिक गट आहे कुटूंबाला इंग्रजीत Family असे म्हणतात. Family हा शब्द लॅटीन भाषेतील Famalus या शब्दापासून तयार झाला आहे. जो शब्द मानवी समुहाचा निर्देश करतो. सर्व सामान्यपणे एक किंवा अनेक मुलासह कायम स्वरूपी एकत्र आलेल्या स्त्री-पुरुषांच्या समुहास कुटूंब संस्था असे म्हणतात. मॅक आयव्हर आणि पेज यांच्या मते मुलांना जन्म देण्यासाठी व त्यांचे संगोपण करण्यासाठी निर्माण झालेल्या व निश्‍चित स्वरुपाच्या दिर्घकाळ टिकणाऱ्या लैंगिक संबंधावर आधारलेला गट म्हणजे कुटूंब होय.

३.२ विवाह : विवाह संस्था ही सर्वच मानवी समाजात एक मुलभूत सामाजिक संस्था आहे. त्यामुळे प्रत्येक कालखंडात या संस्थेला अन्नसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. विविध मानववंशशास्त्रज्ञांनी विवाह संस्थेचा वेगवेगळ्या दृष्टिकोणातून अभ्यास केला आहे. ‘लोवी, मरडॉक, वेस्टरमार्क या मानववंश शास्त्रज्ञांनी समाजमान्य लैंगिक संबंधावर आधारलेली संस्था म्हणून विवाह संस्थेचा उल्लेख केला आहे.’ तर ॲण्डरसन आणि पार्कर यांनी ‘विवाह संस्था ही केवळ स्त्री- पुरुषामधील लैंगिक संबंध नियमित करणारी संस्था नसून ती प्रामुख्याने प्रजोत्पादनाला कायदेशीर स्वरुप देणारी यंत्रणा आहे असे म्हटले आहे’ मदन आणि मुजूमदार यांच्या मते, ‘विवाह हा दिवाणी अगर धार्मिक विधी असून ज्यामध्ये दोन भिन्न लिंगी व्यक्तींना परस्परांशी लैंगिक संबंध ठेवण्याच्या अधिकराबरोबरच अशा संबंधातून जे आर्थिक व सामाजिक संबंध निर्माण होतात त्यांच्याही समावेश होतो.’ हिंदू जीवन पध्दतीनुसार व धर्मशास्त्रानुसार विवाह हा एक महत्वपूर्ण संस्कार समजला जातो. ‘हिंदू धर्मानुसार धर्माचे पालन, पुत्र प्राप्ती आणि लैंगिक गरजांची पूर्तता हे विवाहाचे प्रमुख उद्देश आहे.’ ‘कुटूंबात सदस्याप्रती आपल्या कर्तव्याचे पालन, व्यक्तीमत्व विकास व मानसिक गरजांची पुर्तता करणे हे विवाहाचे उद्देश आहे’. ‘धर्मशास्त्रकाराच्या मते धर्माचरणासाठी स्त्री-पुरुष यांनी एकमेकांना पती-पत्नी म्हणून केलेला स्वीकार म्हणजे विवाह होय’. ‘विवाह संस्थांच्या माध्यमातून लैंगिक गरजांची पूर्तता करणे,

एकमेकाप्रती सहानुभूती व प्रेम मानवी जीवनाच्या प्रमुख गरजांची पुर्तता करण्यासाठी कुटूंब आणि विवाह या दोन संस्थांची अत्यंत आवश्यकता आहे'.

३.३ आप्त संस्था : आप्त संस्था किंवा नातेदार व्यक्ती ही प्रमुख सामाजिक संस्था आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने व्यक्तीच्या रक्ताने व विवाहाने प्रस्तापित झालेल्या नातेसंबंधाचा अभ्यास केला जातो. ही संस्था प्रामुख्याने व्यक्तींच्या नातेवाईक संबंधाचे नियंत्रण करण्याची प्रमुख सामाजिक संस्था आहे. एका व्यक्तीला एकाचवेळी अनेक नातेवाईक असतात आणि त्यांच्या त्याच्याशी अनेक पातळीवरती संबंध प्रस्तापित झालेला असतो. व्यकीला ओळख निर्माण करुन देणारे आप्त संस्था ही प्रमुख असून बहुतेक सर्वच व्यक्तीला त्याच्या कुटूंबापासून आप्त प्राप्त होत असतात.

३.४ जागतिकीकरण : जागतिकीकरण ही एक प्रक्रिया आहे ज्याचे परिणाम समाजाच्या सर्वच घटकावर झालेले आहे. गेल्या दोन दशकापासून जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शौक्षणिक, व इतर काही पैलू आहेत त्यामुळे जागतिकीकरण ही एक सार्वत्रिक सर्वस्पर्शी व गुंतागुंतीची प्रक्रिया ठरते. आल्ब्रो आणि किंग यांच्या मते, ज्या प्रक्रियेद्वारे जगातील लोक एकाच समाजात एकत्रीत होतात. त्या प्रक्रियेस जागतिकीकरण असे म्हणतात. तर रोनाल्ड रॉबर्टसन यांच्या मते, जागतिकीकरण म्हणजे जगाचा संक्षेप करण आणि संपूर्ण जग हे एकच आहे अशी जाणीव वेगाने वाढवणे होय. या जागतिकीकरण प्रक्रियेचा कुटूंब आणि इतरही सामाजिक संस्थांवर मुलगामी परिणाम झालेला आहे.

३.५ सामाजिक माध्यमे : सभोवताली घडणाऱ्या विविध घटनांची आवश्यक माहिती इतरांपर्यंत पोहचविण्याच्या विविध माध्यमांना सामाजिक माध्यमे असे म्हणतात. ज्यामध्ये फेसबुक, व्हॉटसअॅप, टिव्टर, ब्लॉग्ज, इन्सटाग्राम इत्यादीचा समावेश हातो. एकमेकांना प्रत्यक्ष न भेटता संदेश वा इतर आवश्यक माहिती अगदी कमी वेळेत पुरवण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या माध्यमांना सामाजिक माध्यमे असे म्हणतात. सामाजिक माध्यमे हे संवादाचे माध्यम आहे. दूर अंतरावर राहणारे नातेवाईक, संपर्कात नसणारी मित्र मंडळी या संगळ्यांना बांधून ठेवायला संकेत स्थळाचे जाळे कमी पडणारे असे वाऊन सुरू झालेले संवादाची माध्यमे म्हणजे सामाजिक माध्यमे होय. मुळातच सामाजिक माध्यमे ही जास्तीत जास्त लोकांच्या संपर्कात गहण्यासाठी तयार झालेले माध्यम आहे. सामाजिक माध्यमामुळे ज्याच्याकडे याची उपलब्धता आहे. त्याला आपल्या मनातील राग, द्वेश, विखार, प्रेम ओकून टाकायला जागा मिळाली आहे. खरे म्हणजे सामाजिक माध्यमांचा हेतू हा लोकांना जवळ आणणे हा होता पण याच आज प्रत्येकाला जणू व्यसन लोगले आहे. सामाजिक माध्यमाबाबत असेही म्हटले जाते की, ही माध्यमे म्हणजे दुधारी तलवार आहे. माध्यमे म्हणजे पेटती मशाल आहे. आज टिव्टर, व्हॉटसअॅप, इन्सटाग्राम, युटूब, गुगल, प्रिन्टरेस्ट, टयुम्बलर, क्युरा, लिंगडिन इत्यादी प्रमुख सामाजिक माध्यमे वापरात आहेत.

**५.जागतिकीकरणाचा कुटूंबावर झालेला परिणाम:**

जागतिकीकरण आणि विविध सामाजिक माध्यमे यांचा कुटूंबावर अनेक मार्गाने परिणाम झाला आहे. जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. जनसंप्रेषण माध्यमाद्वारे अतिशय वेगाने माहिती, घटना प्रसारीत होत आहे. चार्ल्स कुले यांनी असे प्रतिपादन केले आहे की, जनसंप्रेषण म्हणजे सर्व प्रकारचे मानवी संबंध प्रस्तापित करुन ते विकसीत करणारी यंत्रणा होय. वृतपत्रे, आकाषवाणी, दुरचित्रवाणी, संगणक आणि इंटरनेट ही जनसंप्रेषणाची प्रमुख माध्यमे आहते. औधोगिकीकणानंतर जागतिकीकरणास चालणा मिळाली त्यामुळे अनेक भारतीय आणि परदेशी कंपन्यानी नवनवीन उधोग उभारले. ज्याचा परिणाम कुटूंबाच्या खाण्यापिण्यावर झाला आहे. आज अनेक कंपन्या रेडिमेड खाण्याचे पदार्थ सहजपणे वितरीत करु लागल्या. त्यामुळे कुटूंबात अन्न पदार्थ तयार करण्याचे प्रमाण कमी होत आहे त्याच्या प्रत्यक्ष परिणाम कुटूंबातील सदस्यांच्या संबंधावर होत आहे. जागतिकीकरणाच्या धोरणात वहतूकीवरील खर्च कमी करण्यात आल्याने पर्यटन, हॉटेल उधोगांना चालणा मिळू लागली त्याचाही बरा-वाईट परिणाम

कुटूंबावर होत आहे. जागतिकीकरणामुळे बाजारपेठेचा विस्तार मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे जीवघेणी स्पर्धा निर्माण होवुन वेगवेगळया सामाजिक संस्थावार त्यांच्या परिणाम होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत निर्यातीवरील निर्बध बऱ्याच अंशी काढून टाकल्याने अनेक देशांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडली. व्यक्तीचे दरडोई उत्पन्न् वाढत आहे. त्याची आर्थिक स्थिती सुधारत आहे, परंतु व्यक्ती कौटूंबिक सुखापासून, समाधानापासून दूरावला जात आहे. आज अनेक घरगुती वापराच्या वस्तू आपल्याला सामाजिक माध्यमामुळे सहजपणे माहित होत आहेत व त्या ऑनलाईन प्रक्रियेमुळे कमी वेळेत घरपोहच सुध्दा होत आहेत, त्यामुळे चंगळवादी, भेगवादी संस्कृति वाढत जावून त्यागाची, सहकार्याची, निस्वार्थी भावना कमी होत असून कमालीचा उपयुक्ततावाद वाढत चालला आहे तो केवळ जातिकीकरणामुळे होय. ज्यामध्ये सामाजिक माध्यमांची महत्तवाची भूमिका आहे. जागतिकरण प्रक्रियेमुळे रोजगाराच्या संधी वाढत आहे. असे वाटत असले तरी आज अनेक घरगुती उधोग देशोधडीला लागले आहे त्यामुळे सर्व सामान्य, मध्यमवर्गीयांची कुटूंबे विघटीत होत आहेत. जागतिकीकरण प्रक्रियेमुळे सामाजिक, सांस्कृतिक संबंधाची सरळमिसळ होतानादिसते आहे. सांस्कृतिक, धार्मिक देवाण-घेवाण वाढल्याने सांस्कृतिक अभिरुची सुध्दा बदलत चालल्या आहेत ज्याचा कुटूंबावर नकारात्मक परिणाम होत आहे. एकंदरीत जागतिकरण प्रक्रियेमुळे कुटूंबाच्या संरचनात्मक, कार्यात्मक तसेच सैध्दांतिक दृष्टिकोणातही बदल होत आहे. ज्यामध्ये विविध सामाजिक माध्यमे महत्वाची भूमिका बजावत आहेत.

**६. कुटूंब, विवाह व आप्त संबंधावर सामाजिक माध्यमांचा परिणाम:**

जागतिकीकरण आणि इतर विविध प्रक्रियांचा कुटूंब, विवाह संस्थेवर नकारात्मक परिणाम होत आहे. जागतिकरणामुळे संपूर्ण जग एक लहान खेडे बनले आहे. जनसंप्रेषण साधनामुळे आल्पावधीत संपर्क साधणे सहज शक्य झाले आहे. जनसंप्रेषण साधनांची उणीव भासू नये म्हणून अलिकडील काळात विविध सामाजिक माध्यमांचा वापर मोठया प्रमाणात होवू लागला. खरे पाहता सामाजिक माध्यमांचा उपयोग चांगल्या सकारात्मक कार्यासाठी करता आला पाहिजे. माहिती देवाण-घेवाण करण्याचे अत्यंत साधे, सहज आणि कोठेही उपलब्ध होणारे साधन म्हणून विविध सामाजिक माध्यमाकडे पाहिले पाहिजे. ज्याप्रमाणे संगणक शाप की वरदान अशी चर्चा संगणकाच्या उदय आणि विकासाच्या दरम्यान होत होती अगदी त्याचप्रमाणे आज सामाजिक माध्यमाकडे पाहिले पाहिजे. ज्याचप्रमाणे अपायकारक का उपायकारक? अशी चर्चा होताना दिसत आहे. आपण जर विविध सामाजिक माध्यमांचा वापर विधायक कामासाठी केला तर त्यातून आपल्याला व समाजाला फायदाच होणार आहे. याउलट जर आपण या सामाजिक माध्यमांचा उपयोग विघातक कारवाया करण्यासाठी केला तर त्यातून आपले व समाजाचे आतोनात नुकसान होणार आहे ही गोष्ट सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक ठरते.

विविध सामाजिक माध्यमांचां कुटूंबावर होणारा परिणाम विचारात घेतला तर असे लक्षात येते की, आजच्या धक्काधक्कीच्या, धावपळीच्या स्पर्धात्मक जीवनात सामाजिक माध्यमामुळे आणखीन काही बिकट प्रश्न निर्माण केले आहे. प्रत्येक व्यक्तीला विशेष: कुटूंबातील प्रमुखाला आपल्या कौटूंबीक सदस्यांचा गरजा पूर्ण करण्यासाठी काही तरी नौकरी, व्यवसाय करावाच लागतो, त्यासाठी तो अधीक वेळ आपल्या कुटूंबापासून दूर असतो. जेव्हा तो कामावरुन परत येतो तेव्हा त्याला शारिरिक व मानसिक विश्रांतीची आवश्यकता असते. परंतु आज सामाजिक माध्यमांचे सर्वांनाच जणू व्यसन लागले आहे. प्रत्येकजण आपल्या कामाच्या व्यापातही व विश्रांतीच्या काळातही विविध सामाजिक माध्यमांवर व्यस्त दिसतो. त्यामुळे कुटूंबातील सदस्यांमध्ये समोरासमोरचे संवाद जवळपास बंद झाले आहे. कुटूंबातील अनैपचारिक जागा सामाजिक माध्यमामुळे कुटूंबातील लहान आणि मोठी भांवडे यांच्यामध्ये असणारा प्रेम. जिव्हाळा आज कमी होत आहे. कुंटूंबामध्येही व्यावसायीकता रुजू पाहत आहे. त्यामुळे कुटूंबाच्या एकंदरीत संरचनात्मक ढाच्याला सुरुंग लागत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

सामाजिक माध्यमांमुळे बालकांच्या संगोपणाचा प्रश्न आज निर्माण होतो आहे. पूर्वीच्या काळात बालकाची आई. आजी, आत्या किंवा इतर नातेवाईक घरकामे आटपून पूर्णवेळ मुलाच्या संगोपणासाठी घालत असे. परंतु आज याच्या चित्र दिसत आहे. कुटूंबातील ज्या स्त्रीकडे सामाजिक

माध्यमांचे साधन आहे ती आपला बहुतेक वेळ त्यावरच खर्च करते व आपल्या कौटूंबीक जबाबदाऱ्याकडे दुर्लक्ष करते त्यामुळे कुटूंबातील सदस्यात विशेष: सासू-सून यांच्यामध्ये तणाव निर्माण होत आहे. विविध वाहीन्यावरील मालिका, चित्रपट, जाहिराती यांच्यातील अभासी वास्तवात आजची तरुण स्त्री गुरफटुन जाताना दिसते आहे. त्यामुळे कुटूंबातील सदस्यांकडे लक्ष देण्यासाठी तिच्याकडे पुरेसा वेळच शिल्लक राहत नाही. त्यामुळे भावनात्मक संबंधातील ओलावा आज कोरडा होत आहे. फेसबुक, व्हॉटसॲप, टिव्टर, ब्लॉग्ज, व्हिडिओ कॉल्स, अश्लिल चित्रफिती यामध्ये कुटूंबातील तरुण-तरुणी पूर्णवेळ व्यस्त दिसतात त्यामुळे त्यांच्या अनेक शारिरिक आणि मानसिक समस्यासा निर्माण होत आहेत. सामाजिक माध्यमामुळे बहुतेकांचे वैयक्तिक आज संपुष्टात आल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहेत.

सामाजिक माध्यमांचे विवाहावर सुध्दा दुष्परिणाम होताना स्पष्टपणे दिसत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील विवाह ही एक महत्वाची घटना आहे. व्यक्तीची लैंगिक गरज पूर्ण करण्यासाठी दोन भिन्नलिंगी व्यक्तींना समाजमान्य मार्गाने एकत्र मार्गाने येवून समाजाच्या रुढी, संकेता प्रमाणे व्यवहार करावे लागतात. सामाजिक माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे आज विवाहासाठी जोडीदार निवडण्याची संधी उपलब्ध आहे. फेसबुकवर मैत्री होते, मैत्री चे रुपांतर प्रमोत होते आणि कालांतराने त्यांचा विवाह सुध्दा होतो मात्र तो फार टिकत नाही. कारण त्याला कोणताही भावनात्मक आधारच नसतो. किंबहुना प्रत्यक्ष न पाहता, न भेटता, त्यांच्या आवडी निवडी, त्यांचे जीवनाविषयक दृष्टिकोन जाणून न घेता केवळ सामाजिक माध्यमाद्वारे अभाशी वास्तवता हीच खरी वास्तवता मानुन विवाह करणे अतिशय धोक्याचे आहे. सामाजिक माध्यमांमुळे अशा काही घटना घडत आहेत की, ज्याची आपण कल्पनाही करु शकत नाही. त्यातील एक घटना म्हणजे विवाहीत स्त्री पुरूषांची अविवाहीत स्त्री-पुरूषांशी सामाजिक माध्यमाद्वारे मैत्री होते आणि त्यांचे भरलेले संसार मोडले जातात. अविवाहितांच्या आत्महत्या हा अलीकडील काळातील एक महत्वाचा सामाजिक प्रश्न आहे. सामाजिक माध्यमांद्वारे एखाध्या अविवाहीत तरुणीला बदनाम करणे, तिला ब्लॅकमेलिंग करणे, तिची फसवणूक करणे, तिला फूस लावून पळवून नेणे यासारख्या घटना घटत आहेत त्याचा परिणाम आत्महत्यासारख्या गंभीर प्रश्नामध्ये होतो आहे.

विवाहीत स्त्री-पुरुषांमध्ये एकमेकाप्रती असणारा संशस हा एक विवाहीत जोडप्यामधला प्रमुख प्रश्न आहे. ज्यामध्ये आजच्या सामाजिक माध्यमांनी आणखीन भरच घातली आहे. फेसबुक, व्हॉटसॲप वरील त्यावरील कॉमेंट यामुळे पती-पत्नीमध्ये एकमेकाप्रती अविश्वास निर्माण होत आहे. आपला पती किंवा पत्नीचे बाहेत अनैतिक संबंध आहेत काय? असा प्रश्न बहुतेक सामाजिक माध्यमांचा वापर करणाऱ्या जोडप्यानां आज पडताना दिसतो आहे, ज्याचा परिणाम म्हणुन कालांतराने त्याचे वैवाहिक आयुष्य संपूष्टात ये आहे किंवा ते धोक्याचे आहे. फेसबुक, व्हॉटसॲप व इतर सामाजिक माध्यमांचा इतका वापर वाढला आहे की, प्रत्येक्षात पती-पत्नी एकमेकांना पुरेसा वेळ देवू शकत नाही. त्यांना एकांतवास प्राप्त होत नाही त्याचा परिणाम म्हणून त्यांच्यातील शारिरिक आणि मानसिक आकर्षण कमी होत जावून त्यांचे वैवाहिक जीवन असुरक्षित होत आहे. इतके सगळे वाईट दुष्परिणाम केवळ आजच्या विविध सामाजिक माध्यमामुळे होत आहे. तरी सुध्दा त्याचा अतिरिकी वापर वाढताना दिसतो आहे.

कुटूंब, विवाह या संस्था बरोबरच सामाजिक माध्यमांचा वाईट परिणाम आप्त संबंधावर होत आहे. एकाचवेळी एक व्यक्तीला अनेक आप्तस्वकीय असतात. काही रक्ताचे प्राप्त तर काही विवाह संबंधाने तर काही इतर माध्यमातून. समाजाच्या नियमाप्रमाणे एकटा व्यकी राहू शकत नाही. त्याला इतर सजीव मानव प्राण्यांची आवश्यकता असते. म्हणजेच व्यक्तींच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी सहकार्य करीत असतात. म्हणजेच व्यक्तीच्या जीवनात आप्तांचे स्थान महत्वाचे आहे. परंतु हेच आप्त व त्यांचे महत्व आज सामाजिक माध्यमांमुळे कमी होत आहे. सामाजिक माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे आपल्याला जवळचे वा दूरचे काही आप्तस्वकीय आहेत याची जाणिवच आहे आज पुसट होत चालली आहे. सुखाचे प्रसंग विविध माध्यमांद्वारे वितरीत केले जात आहे. दुखाच्या प्रसंगी सुध्दा अनेकवेळा सामाजिक माध्यमांद्वारे सहानुभूती. दिलगिरी, सांत्वन व्यक्त करून वेळ निभावून नेली जात आहे, त्यामुळे आप्तस्वकियांचे महत्व कमी होत आहे. विविध प्रकारचे मानसिक ताणतणाव, विविध आर्थिक अडचणी प्रत्येक्ष भेटुन आप्तस्वकियांना न सांगता सामाजिक माध्यमांद्वारे व्यक्त केल्या जात आहेत. त्यामुळे आप्त

संबंधातील गोडवा, माया, प्रेम, जिव्हाळा, सहकार्य, निस्वार्थी भावना कमी होत आहे. त्यामध्येही औपचारिकता निर्माण होत आहे. अशा प्रकारे सामाजिक माध्यमांद्वारे कुटूंब, विवाह, आप्त या सामाजिक संस्थाच्या संरचनात्मक पैलूत परिवर्तन होत आहे.

## ७. निष्कर्ष:

कुटूंब, विवाह आणि आप्त संस्थांच्या संबंधावर सामाजिक माध्यमांचा परिणाम या शोधनिबंधातून वरील विश्लेषणाच्या आधारे खालील काही प्रमुख निष्कर्ष पुढे येतात ते म्हणजे.

१. विविध सामाजिक माध्यमांचा वापर आज वाढत आहे.
२. तरुण-तरूणीमध्ये हे सामाजिक माध्यमे अधिक प्रमाणात वापरले जात आहेत.
३. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे कुटूंब आणि विवाह संस्थांत अमुलाग्र बदल होत आहे ज्यामध्ये सामाजिक माध्यमांची भूमिका महत्वाची ठरत आहे.
४. सामाजिक माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे कौटूंबिक स्वास्थ धोक्यात येत आहे. अनेक कौटूंबीक प्रश्न यामुळे नव्याने निर्माण होत आहेत,
५. सामाजिक माध्यमामुळे वैवाहिक जीवन असुरक्षित होत आहे.
६. सामाजिक माध्यमांमुळे आप्तस्वकियामध्ये दुरावा वाढत आहे.

## सूचना :

१. सामाजिक माध्यमांचा वापर विधायक कामासाठी करावा.
२. सामाजिक माध्यमावर प्रशासनाची बारीक लक्ष असावे.
३. सामाजिक माध्यमांचा वापर तरुण-तरुणीमध्ये गरजेपुरताच व्हावा.
४. सामाजिक माध्यमांचा वापर मनोरंजनासाठी होता कामा नये.
५. कुटूंबात, विवाह संबंधात अडथळा ठरु शकतील अशा घटना, संवाद, विनोद, माहिती सामाजिक माध्यमाद्वारे वितरीत केली जावू नये.
६. शाळकरी मुले-मुली यांच्याकडे सामाजिक माध्यमे वापरणसाठीचे साधन असू नये.
७. प्रत्येक व्यकतीने सामाजिक माध्यमावर अधिक वेळ न घालवता वाचन, चर्चा, शारिरीक व्यायाम यावर तो खर्च करावा.
८. पती-पत्नीने एकमेकावर विश्वास ठेवावा.
९. सामाजिक माध्यमावरील प्रत्येक पोष्टावर रिॲक्ट होवू नये.

## संदर्भ सूची:

१. मेंहदळे य. श्री. मानवशास्त्र, सामाजिक व सांस्कृतीक, नारायणन पेठ, पुणे. पृ.क्र . ५०३.
२. सिंग एकता (२००९), कास्ट सिस्टीम इन इंडिया अ हिस्टोरिकल परस्पेक्टीव्ह, काल्पर पब्लिकेशन दिल्ली. पृ.क्र. २०१.
३. सूर्यवंशी व्ही. एल. (१९९७), सामाजिक संस्था आणि सामाजिक गट, विधा बुक पब्लिशर्स, औरंगाबाद पृ.क्र.११३
४. जोशी, करावा (१९६८), सुलभसमाजाशास्त्र, विधा प्रकाशन, नागपूर पृ.क्र.१६८
५. प्रभू पी. एच. (१९६३), हिंदू सोशल ऑर्गनायझेशन, पापुलर प्रकाशन, मुंबई पृ.क्र.१४९
६. कोलारकर शंकुतला (२००५), आयुष्याचा जोडीदार निवडताना, मंगेश प्रकाश नागपूर पृ.क्र.५४
७. क्षीरसागर के. सी. (१९९२), स्त्री जीवन व विवाहविषयक लेख संग्रह, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई.
८. कुमार, प्रसार माध्यमांची भूमिका
९. डोळे जयदेव, प्रसार माध्यमे काल आज आण उध्या.